दै. गोदातीर दि. 15/02/2025

# गोळीबार प्रकरणात मदत करणाऱ्या दोघांना अटक; वाहनेही जप्त -पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)** - शहीदपुरा परिसरात १० फेब्रुवारी रोजी पॅरोलवर आलेल्या सराईत गुन्हेगारांवर गोळीबार झाला होता. त्यात एकाचा मृत्यू झाला तर जन्मठेप झालेला दुसरा विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात उपचार घेत आहे. या प्रकरणात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अधिकाऱ्यांची मोठी टीम तयार करून या प्रकरणाचा उलगडा केला. गोळीबार करणाऱ्या मुख्य आरोपीला मदत करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे.

सोमवार दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास शहिदपुरा परिसरात पॅरोलवर सुटलेल्या गुरमितसिंघ सेवादार व रविंद्रसिंग राठोड यांच्यावर सराईत आरोपीने १० गोळ्या झाडल्या होत्या. नियोजनबद्ध पद्धतीने व रेकी करून गोळीबार करून आरोपी दुचाकीवरून फरार झाला होता. या गोळीबारात रविंद्रसिंग राठोड याचा मृत्यू झाला होता. तर जन्मठेपेची शिक्षा भोगणारा कैदी सेवादार हा जखमी झाला आहे. सेवादार याला हरविंदरसिंघ उर्फ रिंदा संधू याचा भाऊ सत्येंद्रसिंघ उर्फ सत्या याला खून केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झाली होती. पॅरोलवर सुटून तो २२ जानेवारी रोजी नांदेड येथे आला होता.

दरम्यान, हल्लेखोर गोळीबार करून दुचाकीवरून (एमएच २६-बीके-१५६४) पळून गेला होता. सीसीटीव्हीमध्ये तो कैद झाला आहे. तो मूळचा नांदेड येथील रहिवासी नसल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. कुणाच्यातरी मदतीने त्याने हा हल्ला घडवल्याचा संशय पोलिसांना होता आणि त्याच दृष्टीने तपास सुरू होता.

पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधिक्षक सुशिलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, पोलीस निरीक्षक संतोष तांबे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे संकेत दिघे यांच्यासह पोलिसांचे पथक आरोपीचा शोध घेत होते. यात पोलिसांना यश आले असून हल्लेखोरांना मदत केल्याप्रकरणी मनप्रितसिंग उर्फ मन्नु गुरूबक्षसिंग ढिल्लो (वय ३१ रा. शहिदपुरा, नांदेड) आणि हरप्रितसिंघ उर्फ हॅप्पी बाबूसिंघ कारपेंटर (वय २५ रा. शहिदपुरा, नांदेड) या दोघांना अटक केली आहे. या दोघांकडून एक बिना नंबरची दुचाकी आणि एक काळ्या रंगाची, काचांना काळी फिल्म लावलेली चार चाकी गाडी क्रमांक (एमएच२६-सीडी-१६९९) अशा दोन गाड्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणात घटनास्थळी उभी असलेली एका भाविकाची गाडी क्रमांक (एमएच ४९-एएस- ९०८५) नुकसान झाली होती. लवकरच मुख्य मारेकरी हा पोलिसांच्या जाळ्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम करत आहेत.